# दादा, धान्य घोटाळ्यात कारवाई होईल का?

सायं. दैनिक
बीड
प्रारंभ
संपादक - जालिंदर ज्ञानदेव धांडे





## तुमचे अधिकारी म्हणतायेत खराब धान्याच्या लेखी तक्रारीच आल्या नाहीत, मग ही ज्वारी खराब कशी, दादांचा दौरा संपताच हिच खराब ज्वारी लाभार्थीच्या माथी मारण्याची तयारी सुरु

प्रारंभ वृत्तसंस्था

बीड : प्रत्येक महिन्याला पुरवठा विभागाकडून गरजू लाभार्थ्यांना स्वस्त धान्य दुकानामार्फत धान्य पुरवठा केला जातो. परंतु बीड जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी पुरवठा विभागाकडून जे काही मोफत धान्य वाटप करण्यात आले, यामध्ये निष्कृष्ट दर्जाची ज्वारी यावेळेस लाभार्थ्यांना वाटप करण्यात आली. हा गंभीर प्रकार लक्षात आल्यानंतर, यावर माध्यमाने आवाज उठवल्यानंतर हे धान्य वाटप करू नका, या धान्याला तात्काळ स्थगितीचे आदेश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले, परंतु सध्या अति हुशार काही अधिकारी खराब ज्वारी बाबत लेखी तक्रार कसलीही आली नाही, यामुळे खराब ज्वारी चांगली असल्याचे बोलत आहेत, विशेषता अजित पवार यांचा दौरा होताच हीच खराब ज्वारी लाभार्थींच्या माती मारण्याचा घाट काही अधिकाऱ्यांनी मांडला आहे. आज बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार हे आहेत. अजित पवार हे असल्या बे जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. कारण की अजित पवार यांना असले गैरकृत्य चालत नाहीत असं नेहमीच ऐकलं जातं, परंतु आता बीडमध्ये झालेल्या धान्य भ्रष्टाचारामध्ये अजित पवार काय भूमिका घेणार? संबंधित अधिकारी व संबंधित खरेदी केंद्रावर कारवाई करणार का? असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

### सर्वात जास्त खराब ज्वारी बोबडे केंद्राकडुन खरेदी करण्यात आली

### बोबडे खरेदी केंद्राची सविस्तर चौकशी करण्याची गरज

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून अजित पवार यांनी जबाबदारी घेतल्यानंतर, बीड जिल्ह्यातील कारभार सुरळीत चालेल असे वाटत होते. परंतु येथील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांनी परत त्यांची मनमानी बीड जिल्ह्यात सुरू केली आहे. पुरवठा विभागामध्ये मोठ्या प्रमाणात धान्य पुरवठा मध्ये भ्रष्टाचार करण्यात आला असून जनावरे सुद्धा खाणार नाहीत असे धान्य चक्क पुरवठा विभागाने स्वस्त धान्य दुकानात मार्फत लाभार्थ्यांना वाटप केल्याचा धक्कादायक प्रकार बीड जिल्ह्यात घडला आहे. याची माहिती झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी जे काही खराब धान्य आहे ते वाटप करू नका असे लेखी आदेश काढले, यानंतर ही सगळी प्रक्रिया थांबली जरी असली तरीही अजित पवार यांचा दौरा होताच हेच खराब धान्य लाभार्थ्यांना देण्याचा घाट येथील काही अधिकाऱ्यांनी घातल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. विशेषता जे काही खराब धान्य आहे, त्या खराब धान्याबाबत कसल्याही लेखी तक्रारी आलेल्या नाहीत. यामुळे हे धान्य खराब कसे असू शकते असेही काही अधिकारी उघडपणे बोलत आहेत. यामुळे अजित पवार यांचा दौरा होताच हेच खराब धान्य परत लाभार्थ्यांच्या माती मारण्यासाठी येथील मंडळी सज्ज आहे. परंतु आज बीडच्या दौऱ्यावर अजित पवार आहेत ते येथील धान्य घोटाळ्यामध्ये काय कारवाई करतात हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

### बोबडे खरेदी केंद्राची सखोल चौकशी कराच

२०२४ -२५ मध्ये जे काही धान्य खरेदी करण्यात आलं, यामध्ये बीडमध्ये सर्वात जास्त धान्याची खरेदी झाल्याचे आकड्यावरून दिसत आहे. बीडमध्ये सर्वात जास्त जे काही खराब धान्य आहे ते बीडमध्येच खरेदी करण्यात आले आहे. जे काही धान्य बोबडे खरेदी केंद्र यांनी खरेदी केले आहे, त्यांनी ते खरंच शेतकऱ्याकडून घेतले आहे का? का यामध्ये भ्रष्टाचार करण्यासाठी जवळच्याच मंडळीकडुन ते खरेदी केला आहे. याचबरोबर एवढे मोठे उत्पन्न बीड तालुक्यात होते का? हे सर्व प्रश्न आता उपस्थित होत आहेत. यामुळे बोबडे खरेदी केंद्राची सविस्तर जर चौकशी केली तर नक्कीच यामध्ये बोबडे व संबंधित अधिकाऱ्यांनी किती मोठा भ्रष्टाचार केला आहे हे समोर आल्याशिवाय राहणार नाही.

### २०२४, २०२५ मध्ये खरेदी केलेली ज्वारी

| ठिकाण | क्विंटल |
|---|---|
| १) - बीड | ३२,१९८ |
| २) -चौसाळा | १७,६०० |
| ३) -माजलगाव | ३,९३० |
| ४) - शिरुर | ३,६९० |
| ५)- वडवणी | ११,९४६ |
| ६) - पाटोदा | ७,२४४ |
| ७)- यु.वडगाव | ११,७९७ |
| ८)- गेवराई | १५०० |
| एकूण | ८९,९०५ |

### खराब ज्वारीची जबाबदारी नेमकी कोणाची? खरेदी संस्था, जिल्हा मार्केटिंग अधिकारी कि जिल्हा पुरवठा विभाग? हे जिल्हाधिकारी यांनी निश्चित करून दोषीवर कार्यवाही करावी अशी जनतेची मागणी आहे

# रणवीर पंडित यांनी विद्यार्थी खेळाडूंना मोबाईल काढून मैदानावर आणले -गणेश सावंत

## गेवराईचे खेळाडू देशपातळीवर नावलौकिक मिळवतील -जालिंदर धांडे

प्रारंभ । वृत्तसेवा

गेवराई :- शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई तालुक्याच्या क्रीडा क्षेत्रामध्ये चांगले वातावरण तयार झाले आहे, सध्याची युवापिढी मोबाईलच्या रिल्स मध्ये अडकली असताना रणवीर पंडित यांनी शालेय विद्यार्थ्यांना मैदानावर आणून मोठे काम केले आहे असे गौरवोद्गार पत्रकार गणेश सावंत यांनी केले तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना रणवीर पंडित यांनी या क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे, गेवराई सारखीच ही चळवळ आपण बीड जिल्ह्यात सुरु करावी, शिवछत्र परिवाराने सामाजिक क्षेत्रा बरोबरच क्रीडा क्षेत्रातील काम पाहता एक दिवस हे खेळू देशपातळीवर नावलौकिक मिळवतील असा विश्वास संपादनक जालिंदर धांडे यांनी व्यक्त केला. जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाच्या अंतर्गत शारदा क्रीडा महोत्सवात मालेगाव येथील शिवाजी विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन करताना ते बोलत होते.





### क्रिडा महोत्सवात मालेगाव येथे व्हॉलीबॉल स्पर्धेचे शानदार उद्घाटन

शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या संकल्पनेतून जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाच्या अंतर्गत भव्य क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. मंगळवार दिनांक ३० डिसेंबर रोजी मालेगाव येथील शिवाजी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयाच्या भव्य मैदानावर व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष ▶▶ पान २ वर...

### क्रीडा महोत्सवात नाविण्य आणण्या आचा आमचा प्रयत्न-रणवीर पंडित

क्रीडा महोत्सवाचे है चौथे वर्ष असून विद्यार्थी खेळाडूंचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. क्रीडा महोत्सवात नाविण्य आणण्याआचा आमचा प्रयत्न असून या वर्षी जलतरण स्पर्धेचा समावेश करण्यात आला आहे. विविध स्पर्धांमध्ये खेळाडूंने उत्तम खेळाचे प्रदर्शन करणे हे आपल्यासाठी समाधानाची गोष्ट आहे असेही ते यावेळी म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संभाजी सोनवणे यांनी केले. शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक सदाशिव गंगाधर यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. यावेळी जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेतील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी खेळाडू व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वैद्यकिन्ही टोलनाक्याजवळ टोळक्याकडून कुटुंबावर हल्ला



पाटोदा । प्रतिनिधी

**पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही टोल नाक्याजवळ एका महिलेसह तीन जणांना जमावाकडून वेदम मारहाण करण्यात आली आहे. घटना सोमवारी रात्री उशिरा घडली. या प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली.**

या अमानुषपणे मारहाणीचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत असून त्यामध्ये काहीजण गंभीररित्या जखमी झाल्याचे दिसून येत आहे. रात्री साडेनऊ ची घटना घडल्यानंतर जवळपास साडेदहापर्यंत पोलीस ही पोचले नव्हते. दरम्यान, परिसरातील नागरिकांनी जखमींना जिल्हा रुग्णालय बीड येथे उपचारासाठी दाखल केले आहे. जखमीच्या अंगावर मारहाणीचे गंभीर होऊन असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती वैद्यकीय सूत्राकडून देण्यात आली आहे. विशेष म्हणजे या घटनेत एका महिलेचाही समावेश असल्याने नागरिकांमध्ये तीव्र समता व्यक्त केला जात आहे. दरम्यान, ही मारहाण नेमकी कोणत्या कारणावरून करण्यात आली याबाबत अद्याप स्पष्ट माहिती नाही. मात्र, व्हायरल व्हिडिओ मुळे या घटनेची गंभीरता अधोरेखित झाली आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत असल्याचे सांगण्यात आले आहे.

# उपनगराध्यक्षपदी शिवसेनेच्या संजय उडाण यांची नियुक्ती करा- अनभुले, सुरवसे

बीड । प्रतिनिधी

नुकत्याच पार पडलेल्या बीड नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसंग्राम युतीला मतदारांनी भरघोस कौल दिला आहे. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलताताई पारवे यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला असून, युतीचे तब्बल २२ नगरसेवकही विजयी झाले आहेत.





या पार्श्वभूमीवर सलग दोन टर्मपासून नगरसेवक म्हणून कार्यरत असलेले शिवसेनेचे ज्येष्ठ नगरसेवक संजय उडाण यांची उपनगराध्यक्ष पदी निवड करावी, अशी जोरदार मागणी शहरभरातून होत आहे. नगरपालिकेतील दीर्घ अनुभव, जनतेशी असलेला थेट संपर्क आणि पक्षसंघटनातील ▶▶ पान २ वर...



बीड : जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अँड प्रकाश कवठेकर यांना वाढदिवसाच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी(शरदचंद्र पवार) जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# चोऱ्या करणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेने पकडली

## चार घरफोडी व चार चोरीचे गुन्हे उघड

बीड । प्रतिनिधी

दिनांक २७/१२/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाला माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन बीड ग्रामीण हद्दीतील वासनवाडी शिवारातील सर्वे नं. १६० मधील चोरी गेलेली अॅल्युमिनियम तार ही हिस्ट्रीशीटर सराईत गुन्हेगार भिमा लक्ष्मण मस्के रा. बलभीमनगर, वतार वेस बीड याने व त्याचे टोळीने केली





आहे खात्रीलायक माहिती मिळाली. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १) भिमा लक्ष्मण मस्के, वय ३९ वर्षे रा.बलभीमनगर, वतार वेस बीड २) विजय वसंत तायड वय २५ वर्षे, रा.माऊलीनगर, बीड ३) हुसेन बशीर शेख वय ४५ वर्षे, रा. पावर हाऊस जवळ, माऊलीनगर, बीड यांना सापळा रचून बीड शहरातून ताब्यात घेतले. त्यांचेकडे तपास केल्यानंतर त्यांनी खालील गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले.

१) पो.स्टे. बीड ग्रामीण गु. र. नं. ३९८/२०२५ कलम ३०३(२) भा. न्या.सं.

२) माजलगाव ग्रामीण गुर. नं. ४२६/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं.

वरील आरोपींकडून चौरी केलेली एकूण ५०० किलोची अॅल्युमिनियम तार स्थानिक गुन्हे शाखेने जप्त करून आरोपीसह जप्त तार ही पुढील तपास पोलीस स्टेशन बीड ग्रामीणच्या ताब्यात दिली आहे. दिनांक २८/१२/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या ▶▶ पान २ वर...

# न्यू नॉर्मल ?

एकदिवसीय क्रिकेट सामन्याचा धावफलक स्थिर वाटावा, इतक्या वेगाने महापालिका निवडणुकीसंदर्भातल्या बातम्या दाखवणाऱ्या टीव्हीचा पडदा धावतो आहे. दर क्षणाला काहीतरी नवं घडतं आहे. जे बिघडलं असं वाटत होतं, ते घडतं आहे आणि जे घडलं असं गृहीत धरून चाललो, ते बिघडतं आहे. एकाही पक्षाचं संपूर्ण महाराष्ट्रासाठी एक धोरण नाही. कुणाचेही मित्र पक्के नाहीत आणि शत्रू नक्की नाहीत. महापालिकांच्या हद्दी बदलल्या, की मित्र-शत्रूच्या व्याख्या बदलतात आणि पक्षाची धोरणंही इकडून तिकडे १८० अंशात फिरतात. जिथे पक्षपातळीवर 'भेदाभेद भ्रम अमंगळ' अशी भावना आहे, तिथे पक्षातल्या इच्छुक उमेदवारांनी तरी तशी भावना का बाळगावी? इच्छुकही 'सबै भूमी गोपालकी' या न्यायाने क्षणार्धात गळ्यातला गमछा बदलून नव्या बोहल्यावर चढायला तयार असतील, तर त्यांना दोष देण्यात काय अर्थ आहे? वैचारिक बांधिलकी पक्षांनाच महत्त्वाची वाटत नसेल, तर कार्यकर्त्यांना त्याबाबत कसा दोष देता येईल? पक्षनिष्ठा, नेत्यांची सोबत या गोष्टीही दिवसेंदिवस बिनमहत्त्वाच्या ठरू लागल्या आहेत. युती आणि आघाडीची गणितं जुळवताना आपल्या हक्काची जागा राखता आली नाही, तर नेत्यांचा नाईलाज होतो. तेच आपल्या 'निष्ठावंता'ला बाहेरचा मार्ग दाखवतात; 'तिकडले' दरवाजे त्याच्यासाठी उघडले जातील याचीही व्यवस्था करतात. त्यामुळे, वर्षांनुवर्षे एखाद्या पक्षात राहिलेला कार्यकर्ता किंवा कोणा नेत्यासाठी सतत आघाडीवर राहिलेला अचानक गमछा बदलून वेगळेच रंग दाखवू लागला, तर त्याचं आश्चर्य वाटण्याची ही शेवटची निवडणूक असेल! महाराष्ट्राचं राजकारण जर असंच प्रवाहपतित होऊन पुढे जाणार असेल, तर यापुढे मतदाराला कशाचंच आश्चर्य वाटणार नाही, हा यातला सर्वात मोठा धोका आहे. नवीन पिढीला तर हेच 'न्यू नॉर्मल' वाटेल. पक्षसंघटनांचं अस्तित्व आणि संविधानाने स्पष्ट केलेल्या राजकीय पक्षांच्या व्याख्या, लक्षणं वेगाने विरून जातील. यापूर्वी कधीही न पाहिलेलं संपूर्ण व्यवहारवादी राजकारण या निवडणुकीत पाहायला मिळतं आहेच. महानगरपालिकांनंतरच्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका झाल्या, की त्यानंतर येणाऱ्या निवडणुका यापुढचा टप्पा दाखवतील, ते समजून घेण्यासाठीच त्या निवडणुकांची उत्सुकता असेल!


भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांची युती सर्वप्रथम जाहीर झाली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण किंवा शिंदे आणि वनमंत्री गणेश नाईक ही न जमणारी समीकरणं या युतीसाठी जमवली गेली. त्यांच्या एकत्रित बैठका झाल्या. मतभेद मिटवून युती झालीच पाहिजे, या निर्धाराने सगळे नेते वागताना दिसले. जिथे अवघड वाटत होतं, तिथे वरिष्ठ नेतृत्वाने हस्तक्षेप करून प्रश्न सोडवले. वरिष्ठ नेतृत्व त्याबाबत यशस्वीही झालं. पण, जिथे अडचण येईल असं वाटत नव्हतं, तिथेच घोडं अडलं. पुणे, नाशिक आणि अन्य एक-दोन ठिकाणी युतीसाठी परिस्थिती कसोटीची ठरते आहे. स्थानिक नेतृत्वावर न सोडता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच तिथल्या गाठी सोडव्यावा लागतील, असं दिसतं आहे. इच्छुकांची संख्या सगळीकडेच अमाप आहे. त्यातून काही प्रश्न निर्माण झाले असले, तरी निकालानंतर या महापालिका सुरळीतपणे चालायच्या असतील, तर वरिष्ठ नेत्यांनीच समजुतीने विचार केला पाहिजे. मार्ग काढायचाच या निर्धाराने संवाद झाला, तर ते कठीण नाही. राज्य चालवताना जे मतैक्य दिसतं, तेच स्थानिक स्वराज्य संस्थांत उतरल्याशिवाय राज्यात 'ट्रिपल इंजिन' धावणार नाही! काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची युती वरवर आकर्षक दिसत असली, तरी ती काँग्रेसमधल्याच अनेकांच्या पचनी पडलेली नाही. पक्षाच्या मुंबईच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड २५ वर्षांनंतरच्या या ऐतिहासिक घोषणावेळी उपस्थित नव्हत्या, यातूनच काय ते स्पष्ट होतं. 'मनसे नको' या अट्टहासापायी महाविकास आघाडी त्यांनीच मोडली आणि आता 'वंचित'लाही त्यांचाच विरोध आहे. राष्ट्रीय समाज पक्ष, आणि गवई गटाला सोबत घेण्याबाबत त्यांची भूमिका काय आहे, ती त्यांनी अजून स्पष्ट केलेली नाही. 'वंचित'बरोबरची युती ज्यांनी परस्पर घडवली, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ आणि प्रवक्ते सचिन सावंत यांचं मुंबईच्या पक्षात किती वजन आहे, हे ज्यांना माहिती आहे ते या युतीचे नेमके परिणाम समजू शकतील. काँग्रेस आणि वंचितच्या युतीमुळे आता महायुतीलाही रिपब्लिकन पक्षाला (आठवले) बऱ्यापैकी जागा देऊन सामावून घ्यावं लागेल. प्रकाश आंबेडकर यांच्यामुळे केंद्रीय समाजकल्याण राज्यमंत्री रामदास आठवले यांचा नेहमी फायदा होतो, तो असा. मुंबईत खरी ताकद कोणाची हे दाखवून देण्याची दोघांनाही संधी आहे. नव्या पिढीचा कल त्यामुळे स्पष्ट होणार आहे. सर्वच राजकीय पक्षांना या पुढची राजकीय गणितं मांडताना या मुकाबल्याचा फायदा होईल!

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (दोन्ही) आजही राजकीय डावपेचांसाठी खुद्द शरद पवार यांच्याशिवाय अन्य कोणी नाही, हे पुन्हा एकदा दिसतं आहे. पक्षसंघटना शिल्लक नसताना राज्याच्या राजकारणात अस्तित्व राखण्यासाठी ते पुन्हा एकदा स्वतःची प्रतिमा पणाला लावून डाव खेळताहेत. पुतण्या अजित पवार यांना त्यांनी महायुतीच्या सीमारेषेवर आणून ठेवलं आहे. मुंबई, पुणे आणि पिंपरी-चिंचवड या तीन महापालिकांवरच लक्ष केंद्रित केलं आहे. दोन्ही राष्ट्रवादींच्या हातमिळवणीला महायुतीतून काही अडचण आलीच, तर त्यांनी मुंबईत ठाकरे बंधूंसोबत; अन्यत्र काँग्रेसबरोबर बोलणी सुरू ठेवली होती. 'जिथे चांगला सौदा होईल, तेच धोरण' या न्यायाने त्यांनी सगळ्यांनाच बोलण्यांत गुंतवून ठेवलं. त्याचा फटका शेवटी जे यात गुंतले, त्यांनाच बसणार आणि ते सगळे पुन्हा पवार यांच्या बेभरवशी राजकारणाच्या नांवे खडे फोडणार!

# काँग्रेसचा नारा कितपत खरा ?

पक्षाच्या विचारधारेवर आणि नेतृत्वावर पूर्ण विश्वास ठेऊन पक्षासाठी समर्पितपणे काम करणारा मोठा वर्ग आजही काँग्रेसमध्ये आहे. त्याला काँग्रेसमधील 'निष्ठावंत' असे म्हणतात. महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यातील अशा निष्ठावंत घराण्यांना म्हणूनच राजकीय वर्तुळात किंमत होती. मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्याचा उल्लेख झाला, की काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय गृहमंत्री, माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांचे घराणे डोळ्यांसमोर येते. एकेकाळचा काँग्रेसचा नांदेडचा गड आता भाजपचे सत्ताकेंद्र म्हणून ओळखला जात आहे. माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण आणि त्यांची मुलगी श्रीजया चव्हाण यांनी नांदेडच्या गडावर कमळ फुलविले आहे. खासदारकी आणि आमदारकी पिता-पुत्रीकडे असल्याने काँग्रेसच्या 'हाता'ला आधार देण्यासाठी नवे नेतृत्व शोधण्याची वेळ काँग्रेसवर आली. माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या स्नुषा अर्चना पाटील यांनी एक वर्षापूर्वी भाजपमध्ये प्रवेश केला; मराठवाड्यातीलच हिंगोली जिल्ह्यातील काँग्रेसचे एकनिष्ठ घराणे म्हणून सातव घराणे परिचित होते. विधान परिषदेच्या काँग्रेसच्या आमदार प्रज्ञा सातव यांनी आमदारकीचा राजीनामा देऊन थेट भाजपमध्ये प्रवेश केला. सातव यांनी दिलेल्या राजीनाम्यानंतर काँग्रेस पक्षामध्ये किती अस्वस्थता पसरली, हे लपून राहिले नाही. 'निष्ठावंत' प्रज्ञा सातव यांनी भाजप प्रवेशानंतर दिलेली प्रतिक्रियाही बोलकी आहे. 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात जो विकासाचा रथ सुरू आहे त्यामुळे विकासासाठी भाजपशिवाय पर्याय नाही,' असे त्यांनी म्हटल्याने काँग्रेसच्या निष्ठावंत घराण्यातील व्यक्तींनाही यापुढे देशात भाजपशिवाय भवितव्य नाही, असे वाटू लागले हे निश्चितच. त्यातून सर्वसामान्य तळागाळातील काँग्रेस कार्यकर्ता नक्कीच बिथरला असणार, हे अर्थातच नव्याने सांगायला नको.

देशपातळीवर देशातील सर्वात जुना पक्ष असलेल्या काँग्रेसला स्वत:चे अस्तित्व टिकविण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीनंतर विरोधी पक्ष टिकविण्यात यश आले असले, तरी पुढील १० वर्षांत काँग्रेस सत्तेवर येईल का, याची चिंता काँग्रेसच्या दिल्लीपासून गल्लीपर्यंत सर्वच नेत्यांना सतत सतावत असते. २०१४ आणि २०१९



मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला साधा विरोधी पक्ष नेतेपदावर दावा करता येईल, एवढे संख्याबळ मिळवता आले नाही. तेव्हापासूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रियतेमुळे 'काँग्रेसमुक्त भारत' होण्याची प्रक्रिया सुरू झालेली दिसते. त्यात वैचारिक भूमिकेत संभ्रम असल्याने बहुसंख्य हिंदू मतदार काँग्रेसपासून दुरावला. अयोध्येतील रामजन्मभूमी मंदिराच्या सोहळ्यापासून काँग्रेसने स्वत:ला वेगळे करण्याचा प्रयत्न केल्याचा फटका काँग्रेसला बसला. या सोहळ्याला हजेरी लावली, तर मुस्लीम वर्ग नाराज होईल, अशी गणिते काँग्रेसचे धुरंधर मांडत राहिले. रामजन्मभूमीचा कडवा विरोध करूनच आपण सत्तेवर येऊ शकतो, असे काँग्रेसच्या धुरिणांना वाटले. म्हणून त्यांनी न्यायालयाचे खटले कसे दीर्घकाळ चालतील, ते बघितले. न्यायालयामध्ये रामाच्या अस्तित्वावरच शंका उपस्थित केल्या. मंदिर बाबराने पाडले, याला ऐतिहासिक पुरावा नाही, असा युक्तिवाद केला. सर्वोच्च न्यायालयात दहा-बारा वकिलांची फौज उभी केली आणि सोनिया गांधी जेव्हा काँग्रेसच्या सर्वेसर्वा झाल्या, त्यावेळी त्यांनी 'बाबरी ढाचा' पडल्याबद्दल मुसलमान समाजाची माफीसुद्धा मागितली; परंतु १९९२ नंतर एवढी सगळी मुस्लीमधार्जिणी भूमिका घेऊनही काँग्रेसला लोकसभेत निर्विवाद बहुमत मिळविता आले नाही, हे वास्तव आहे. काँग्रेसची हक्काची मुस्लीम मते वेगवेगळ्या प्रादेशिक पक्षांत विभागली गेली. दिल्लीत केजरीवाल, उत्तर प्रदेशात मायावती आणि अखिलेश यादव, बिहारमध्ये नितीश कुमार, बंगालमध्ये ममता बॅनर्जी आदी मुस्लीम मतांचे ठेकेदार बनले. तरीही काँग्रेस पक्षाला मुस्लीम मते आपल्यापासून दूर जाऊ नये असे वाटते.

दलित, मुस्लीम मतांच्या राजकारणामुळे राज्यातील महाविकास आघाडीतील काँग्रेस पक्षाने मुंबईसह प्रमुख महापालिका निवडणुकीत स्वबळाचा नारा दिला आहे. मुंबई महापालिका निवडणुकीत स्वतंत्र लढण्याचा निर्धार काँग्रेसच्या मुंबई अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी केला आहे. उबाठा सेना आणि मनसे एकत्र आल्यामुळे त्यांच्यासोबत आपल्याला जाता येणार नाही, असे पोकळ कारण दिले असले, तरी मुस्लीम व्होट बँक भविष्यात आपल्या हातून जाऊ नये ही काँग्रेसची भीती आहे. जात, धर्म यांच्यात द्वेष निर्माण करणाऱ्या पक्षांबरोबर आपण जाणार नाही, असे सांगणाऱ्या मुंबई काँग्रेसने उबाठा सेनेसोबत महाराष्ट्राच्या सत्तेत येण्यासाठी कशी तडजोड केली, हे सांगत नाहीत. काँग्रेसमध्ये आता 'राम' राहिलेला नाही, याची खात्री पटल्यामुळेच मुंबई शहरातील काँग्रेसच्या निष्ठावंतापैकी एक असलेल्या मुरली देवरा यांच्या घराण्याने काँग्रेसपासून फारकत घेतली. २० वर्षांपेक्षा अधिक काळ मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष असलेल्या मुरली देवरा यांचा मुलगा मिलिंद देवरा यांनी महायुतीतील मित्रपक्षात प्रवेश केला ते सध्या राज्यसभेचे खासदार आहेत. वांद्रे येथे एक वर्षापूर्वी ज्यांची हत्या झाली ते बाबा सिद्दिकी हे काँग्रेसच्या निष्ठावंत पदाधिकाऱ्यांपैकी एक मानले जात होते. त्यांनीसुद्धा काँग्रेसला सोडण्याचा निर्णय घेतला होता. मुंबई महापालिकेतील अभ्यासू नगरसेवक रवी राजा यांच्यासह चार नगरसेवकांनी काँग्रेसला सोडून भाजपमध्ये आधीच प्रवेश केला आहे. पक्षातील निष्ठावंत एकामागोमाग भाजप आणि अन्य पक्षात प्रवेश करत असताना मुस्लीम आणि दलित मतदार आपल्या पाठिशी आहे, असा भाबडा समज करून काँग्रेसचा 'एकला चलो रे'चा नारा कितपत योग्य आहे, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. त्यासाठी महापालिका निवडणुकींच्या निकालाची प्रतीक्षा करावी लागेल.

पान १/४ वरून

## 'महाविस्तार' एआय अँपद्वारे

मंडळातील शेतकऱ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने विकसित केलेल्या 'महाविस्तार' एआय ॲपच्या माध्यमातून आधुनिक व शाश्वत शेतीचा अवलंब करावा, असे आवाहन सहाय्यक कृषी अधिकारी श्री. एम आय शेख व श्री. बी आर मोहोळकर यांनी केले. बदलते हवामान, वाढता उत्पादन खर्च व शेतीतील जोखीम लक्षात घेता तंत्रज्ञानाचा वापर करणे आज अत्यावश्यक बनले असल्याचे त्यांनी सांगितले.

'महाविस्तार' एआय ॲपद्वारे शेतकऱ्यांना पिकांचे शास्त्रीय मार्गदर्शन, खत व्यवस्थापन, सिंचन पद्धती, कीड व रोग नियंत्रण, सेंद्रिय व रासायनिक उपाय, बाजारभाव, हवामान अंदाज तसेच डिजिटल शेतीशाळा यासह आवश्यक सर्व माहिती एका ठिकाणी उपलब्ध होते. त्यामुळे शेतीविषयक निर्णय अधिक अचूकपणे घेणे शक्य होते.

या ॲपच्या माध्यमातून शेतकरी आपल्या पिकांचे फोटो अपलोड करू शकतात. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने काही क्षणांतच पिकांवरील रोग, कीड अथवा पोषणतत्त्वांच्या कमतरतेचे निदान होऊन त्यावर योग्य उपाययोजना व मार्गदर्शन मिळते. यामुळे पिकांचे नुकसान टाळता येऊन वेळेत उपचार करणे शक्य होते.

तसेच, शासकीय कृषी योजना, अनुदान प्रक्रिया, प्रशिक्षण कार्यक्रम व विविध कृषीविषयक माहिती मिळवण्यासाठीही 'महाविस्तार' एआय ॲप अत्यंत उपयुक्त असल्याचे सहाय्यक कृषी अधिकारी श्री.एम आय शेख व श्री.बी आर मोहोळकर यांनी नमूद केले. गेवराई तालुक्यातील व मादळमोही मंडळातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी हे ॲप आपल्या मोबाईलमध्ये डाउनलोड करून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. यासोबतच सहाय्यक कृषी अधिकारी श्री. व्ही. बी. सानप, श्री. आर. के. मेहेत्रे, श्री. शंभुनाथ ढाकणे, श्रीमती वंदना शिंदे, श्री. के. के. पवार, श्री. आनंद पक्षे व श्रीमती. शिवकन्या पारखे यांच्याकडूनही शेतकऱ्यांना 'महाविस्तार' एआय ॲप वापरण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## जिल्ह्यात पहिल्यांदाच फक्त

आहेत. श्री सिद्धिविनायक सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये आता बाल शक्यचिकित्सक व त्या साठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध झाल्यामुळे, बीड व आजूबाजूच्या जिल्ह्यातील रुग्णांना छ. संभाजीनगर, पुणे, मुंबई सारख्या मोठ्या शहरांकडे जाण्याची आवश्यकता राहिलेली नाही. विशेष म्हणजे, ही शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना (चगझग-ध) अंतर्गत पूर्णपणे मोफत करण्यात आली, ह्यासाठी खाजगी रुग्णालयात यासाठी ३ ते ४ लाख रुपयाचा खर्च लागतो. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही उच्च दर्जाच्या उपचारांचा लाभ श्री सिद्धिविनायक सुपरस्पेशियालीटी हॉस्पिटल च्या माध्यमातून बीड शहरातच अगदी मोफत मिळणार आहे.

## महावितरणचा 'शॉक'! सहा

दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

केवळ निवेदन देऊन न थांबता, शितल धोंडरे यांनी दोषी अधिकाऱ्यांच्या चौकशीची मागणी केली आहे. सहा महिने फिडर बंद ठेवून जनतेला वेठीस धरणे हा गुन्हाच आहे. जर पुढील ७ दिवसांत जातेगावचा गावठाण फिडर पूर्ण क्षमतेने सुरू झाला नाही, तर महावितरणच्या कार्यालयाला टाळे ठोकून तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा निर्वाणीचा इशारा धोंडरे यांनी दिला आहे.

प्रमुख मागण्या:

* जातेगाव गावठाण फिडर तात्काळ चार्ज करून कार्यान्वित करावा. * लो-व्होल्टेज आणि ट्रिपिंगची समस्या कायमस्वरूपी निकाली काढावी. * विलंब लावणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी व्हावी. शितल धोंडरे यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे आता महावितरणच्या गोटात खळबळ उडाली असून, प्रशासन यावर काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आनंदग्राम हे मानवतेचे

अभियान म्हणजे देहदान..,

माझ्या स्वारातीच्या ४० वर्षाच्या काळात असे अनोखे देहदान मी कधी पाहिले व ऐकले नाही. भावनेच्या भरात, प्रेरित होऊन देहदानाचे फॉर्म भरले जातात पण ऐनवेळी आम्हाला कळवले जात नाही. त्या दिवशी दादांच्या या देहदान सोहळयास स्वाराती मेडिकल कॉलेज येथे उपस्थित राहण्याचे भाग्य मला लाभले अन् त्याच संदर्भाने आनंदग्राम येथे तात्काळ भेट देण्याच्या उत्सुकतेने स्वस्थ् बसू दिले नाही. आनंदग्रामने या महत्त्वपूर्ण चळवळीची सुरुवात आपल्या कुटुंबापासूनच करावी ही फार कठीण गोष्ट आहे. आमच्या मेडिकल क्षेत्रालाही प्रेरणादायी असे हे पाऊल असल्याचे ते म्हणाले..

दत्ताभाऊंचे सासरे म्हणजे संध्याचे वडील हे आनंदग्राम मध्ये १८ वर्षे वास्तव्यास होते. ते इथे आश्रमाच्या गाईंचा सांभाळ करत, चुलीवरची लाकडं फोडत अन् लहानग्या लेकरांना आधार देत. अनेक छोटी बाळ दादांच्या अंगाखांदयावर लहानाची मोठी झाली, त्यांचा लळा – ममत्व सागराएवढे..!

दादा दररोज भगवतगीतेचे एक तरी पान वाचल्याशिवाय झोपत नसत. ते शाकाहारी होते. कधीही त्यांनी हिंसा केली नाही की कुणावर हात उगारला नाही. आनंदग्राममधे दादांच्या आजूबाजूला सर्व वृक्ष आहेत. इथे हजारो झाडांची लागवड दिसते. त्यामुळे पशुपक्षांचा चिवचीवाट अन् लेकरांचे बागडणे हे मनाला मोहून टाकते.

दादांचे दोन वेळा रोड अपघात झाले, त्यांची स्वारातीला उपचार घेत शस्त्रक्रियाही झाली. ते ऋण फेडण्यासाठी या निर्धन आनंदयात्री जवळ दुसरे काही नव्हते.

म्हणून माझा देह स्वारातीला द्या, त्यावर अनेक डॉक्टर

शोध-संशोधन करून माझ्यासारख्या अनेकांच्या वेदना कमी करतील हा संकल्प बोलून दाखवल्यामुळे दत्ताभाऊ व संध्याताईंने त्यांच्या मरणोत्तर इच्छेप्रमाणे त्यांचा देह आम्हाला दान केला.

त्यांची अंत्ययात्रा म्हणजे मानवतेचा उत्सव होता, ठिकठिकाणी पुष्पचक्र, अमर रहे च्या घोषणा, देहदान..... श्रेष्ठदान, वंदे... मातरम, भारत माता की... जय या घोषणांनी स्वाराती पवित्र झाले. दादांचा तो देह आनंदग्रामने केवळ स्वारातिलाच दिला नाही, त्यावर केवळ वैद्यकीय शोध- संशोधनच होणार नाही तर आनंदग्रामने तो देह मानवतेला दिलाय.. , तो देह भारत मातेला अर्पण केलाय.. , तो देह समाजातील दया, क्षमा, शांती, प्रेम व अहिंसेला वाहीलाय... , त्या देहाचा पंचमहाभूतांनाही अचंबा वाटावा अशा परोपकारी प्रवासाला गेलाय..!

जिथे इतरांचे अश्रू पुसले जातात, जिथे दुसऱ्यांसाठी देह झिजतो, जिथे बाळगोपाळांचा मेळा नाचता बगडतांना दिसतो, तिथे आल्यावर साक्षात गर्वहरन होते, मानवतेचे दर्शन घडते, तीच खरी पंढरी असते.

आनंदग्राम वर दया, क्षमा, शांती दिसली. या शक्ती स्थळावर परोपकार, समर्पण दिसले. इथे निसर्ग खुलतांना, हसताना दिसला. इथे मानवता बोलतांना दिसली, इथला प्रत्येक जीव हा आनंदाने बागडताना दिसला.

म्हणून आनंदग्राम ही एक संस्था, संस्थान, ठिकाण नव्हे, तर हे एक जिवंत चालते- बोलते विद्यापीठ होय. हे मानवतेचे विद्यापीठ आहे असे मनोमन वाटते. हे भावोउद्गार काढून डॉ. बिराजदार यांना भावना अनावर झाल्या. त्यांनी दादांच्या प्रतिमेला त्रिवार वंदन केले आणि डोळे पुसले..!त्यांच्या स्मृती असलेल्या वडाच्या झाडासही अभिवादन केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार व सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर वडमारे, ड पन्हाळे हे उपस्थित होते.

## अवैध वाळू उपसा करणाऱ्या

असलेली ०१ ब्रास वाळु किंमत ६,०००/- रु व वाळु भरणेसाठी वापरलेली पिवळ्या रंगाची जेसीबी मशिन किं. २६,००,०००/- रु असा एकुण ३४,०६,०००/- रु चा मुद्देमाल जप्त केला असुन उपरोक्त दोन्ही आरोपी यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके, उपविभाग गेवराई, पोलीस निरीक्षक किशोर पवार, सपोनि/ दिपक लंके यांचे मार्गदर्शनामध्ये पोलीस उपनिरीक्षक राम खोत, पोलीस अंमलदार लक्ष्मण जायभाये, जितेंद्र ओव्हळ, रामेश्वर काकडे, गोरख डोके यांनी केली.

## सोयाबीन खरेदी केंद्रावर

सहा ते सात दिवसापासून बारदाना उपलब्ध नसल्याने सोयाबीन खरेदी करण्याचे काम पूर्णतः ठप्प झालेले आहे परिणामी हजारो शेतकऱ्यांना आपली सोयाबीन विक्री करता येत नसून त्यांना मोठ्या आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे शेतकऱ्याचा हा प्रश्न शासनाने तात्काळ मार्गी लावा वा म्हणजे जिल्ह्यातील सर्व सोयाबीन खरेदी केंद्र सुरू होतील सोयाबीन खरेदी केंद्रावर तात्काळ बारदाना उपलब्ध न करून दिल्यास ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी दिला आहे.

## उपनगराध्यक्षपदी शिवसेनेच्या

योगदान लक्षात घेता संजय उडाण हे उपनगराध्यक्ष पदासाठी योग्य उमेदवार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. दरम्यान, बीड नगरपालिका निवडणुकीतील विजयामध्ये यथायोग्य योगदान देणाऱ्या मित्र पक्ष शिवसेनेला न्याय मिळावा, या उद्देशाने राष्ट्रवादी काँग्रेसने शिवसेनेचे नगरसेवक संजय उडाण यांची उपनगराध्यक्ष पदी निवड करावी, अशी अधिकृत मागणी शिवसेना बीड विधानसभा प्रमुख सुनिल अनभुले आणि शिवसेना बीड जिल्हा संघटक सुनिल सुरवसे यांनी केली आहे. युतीतील घटक पक्षांमध्ये समन्वय राखून योग्य निर्णय घेण्यात यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत असून उपनगराध्यक्ष पदाबाबत लवकरच सकारात्मक निर्णय होईल, असा विश्वास शिवसेना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

## रणवीर पंडित यांनी विद्यार्थी

रणवीर पंडित, पत्रकार गणेश सावंत, जालिंदर धांडे जयभवानीचे माजी संचालकअप्पासाहेब खराद, माजी पंचायत समिती सदस्य शिवाजीराव गंगाधर, बळीरामजी खराद,जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक नंदकिशोर गोरडे, बाजार समितीचे संचालक बाबासाहेब जाधव, चेअरमन पवन चव्हाण, अंगदराव खरात, सरपंच बबनराव बोरकर, विश्वनाथ सोनवणे, विलास वाघमोडे, संदीप मडके, परिक्षीत जाधव, देविदास खरात, अशोक बोरकर, कल्याणराव खरात, शिवाजीराव खरात यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. सार्थक लेंडगुळे या विद्यार्थ्यांने खेळाडूंना शपथ दिली.त्यानंतर मुले आणि मुलाच्या गटांमध्ये होणाऱ्या होणाऱ्या या व्हॉलीबॉल स्पर्धेचा शुभारंभ उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला, दोन मैदानावर होणा-या या व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये संस्थेचे १८ शाळेचे संघ सहभागी झालेले आहेत.

## चोऱ्या करणारी टोळी

पथकाने १) विरसिंग शेरसिंग गोके, वय २४ वर्षे, रा. पोलीस कॉलनी शेजारी, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई जि. बीड २) मोहनसिंग मोहब्बतसिंग टाक, वय २१ वर्षे, रा. बसस्टँडच्या पाठीमागे, वडवणी ता. वडवणी जि. बीड ३) जिगरसिंग मोहब्बतसिंग टाक, वय १९ वर्षे, रा. बसस्टँडच्या पाठीमागे, वडवणी ता. वडवणी जि. बीड यांना वडवणी येथून ताब्यात घेऊन त्यांनी केलेल्या चार घरफोडी व दोन चोरी गुन्हे निष्पन्न केले. या आरोपीकडून खालील गुन्हे उघडकीस आणले आहेत. १) पो.स्टे.धारुर गु.र. नं. ४५८/२०२५ कलम ३३१(४),३०५ (अ),३(५) भा. न्या.सं. २) पो.स्टे,धारुर गु.र. नं. ४५२/२०२५ कलम ३३४(२),३०५ (अ) भा.न्या.सं.३) पो.स्टे. अंबाजोगाई शहर गुर. नं. ५६६/२०२५ कलम ३०३(२) भा. न्या.सं.४) पो.स्टे.अंबाजोगाई ग्रामीण गु.र. नं.४१२/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं.५) पो.स्टे.नेकनूर गु.र. नं.३५८/२०२५ कलम ३३१(४),३०५ (अ) भा. न्या.से. ६) पो.स्टे. संभाजीनगर, परळी गुरु नं. १५४/२०२५ कलम ३३१(४),३०५,३३३ भा. न्या.सं.अल्युमिनियम तार, पानबुडी मोटारी चोरणाऱ्या वेगवेगळ्या दोन टोळ्या पकडल्याने मागील दोन दिवसात स्थानिक गुन्हे शाखेने वरील चार घरफोडी व चार चोरीचे गुन्हे उघड केले आहे. वरील आरोपींकडून कॉपर केबलचे तीन बंडल, पानबुडी व बोरच्या ६ मोटार, पाच शेळया असा एकूण ३,२१,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमाल व आरोपी पुढील तपास कामी मो.स्टे. धारुर यांचे ताब्यात देण्यात आलेले आहेत. सदरील कामगिरी ही श्री नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, श्री शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा,बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार रामचंद्र केकान, मारोती कांबळे, सोमनाथ गायकवाड, विष्णू सानप, पोलीस नाईक गोविंद भताने, पोलीस अंमलदार सचिन आंधळे, विकी सुरवसे, चालक पोलीस हवालदार अतुल हराळे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे.

# जामखेड परिसरात अवैध दारू विक्रीवर स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई

## १ लाख ६८ हजार ९६० रुपयांचा देशी दारू साठा जप्त; एकास अटक

जामखेड । प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्ह्यात अवैध दारू व्यवसाय व इतर बेकायदेशीर धंद्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मा. श्री. सोमनाथ घार्गे यांनी दिल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने जामखेड तालुक्यात मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत जामखेडनान्नज रस्त्यावरील चुंबळी शिवारात अवैध देशी दारूची विक्री करणाऱ्या एका इसमास ताब्यात घेऊन तब्बल १,६८,९६० रुपये किमतीचा देशी दारू साठा जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. किरणकुमार कबाडी यांनी विशेष पथक गठीत केले होते. दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी पोउपनि. समीर अभंग, पोलीस अंमलदार हृदय, घोडके, शामसुंदर जाधव तसेच चालक अरुण मोरे यांचे पथक जामखेड पोलीस ठाणे हद्दीत अवैध धंद्याबाबत माहिती काढत असताना गस्त घालत होते. दरम्यान, जामखेड ते नान्नज जाणाऱ्या रस्त्यावर चुंबळी गावाच्या शिवारातील न्यू रशिका हॉटेल येथे तुषार



जगताप हा देशी दारूची अवैध विक्री करत असल्याची गोपनीय माहिती पथकास मिळाली. त्यानुसार सदर ठिकाणी तात्काळ छापा टाकण्यात आला. छाप्यावेळी एक इसम आढळून आला. त्यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव तुषार विठ्ठल जगताप (वय ३२ वर्षे, रा. शिवाजीनगर, जामखेड, ता. जामखेड) असे सांगितले. पंचासमक्ष झडती घेतली असता सदर ठिकाणी ४४ सिलबंद बॉक्स देशी दारू आढळून आले. प्रत्येक बॉक्समध्ये ४८ सिलबंद बाटल्या असून एकूण दारू साठ्याची किंमत १,६८,९६० रुपये असल्याचे स्पष्ट झाले. सदर सर्व मुद्देमाल जप्त करून आरोपीस ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी पोलीस अंमलदार श्यामसुंदर अंकुश जाधव (पोना/१५६६) यांच्या फिर्यादीवरून जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ६८३/२०२५ महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई सुरू असून अधिक तपास जामखेड पोलीस स्टेशनकडून केला जात आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा. श्री. सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली असून पथकातील सर्व अधिकारी व अंमलदारांचे कार्य कौतुकास्पद असल्याची प्रतिक्रिया वरिष्ठ स्तरावरून व्यक्त करण्यात आली आहे.

# महानगरपालिका निवडणूक आजपर्यंत ४८ अर्ज दाखल

## भाजप राष्ट्रवादी शिवसेना युती झाल्यास बंडखोरी,अपक्ष उमेदवार वाढणार

जालना । प्रतिनिधी

जालना महापालिका निवडणुकीसाठी भाजप, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गट, या पक्षाची युती होण्यासाठी तारीख पे तारीख असा प्रकार सुरू आहे यामुळे कोणाला तिकीट मिळणार कोणाला नाही मिळणार हे चित्र लवकरच स्पष्ट होणार आहे. उमेदवारी अर्ज खरेदी आणि दाखल करण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून उमेदवारी दाखल करण्यासाठी आता फक्त सोमवार मंगळवार दोन दिवस उरले आहे यावेळी वेळ कमी असल्यामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. तसेच भाजप, शिंदे गट शिवसेना, अजित पवार गट राष्ट्रवादी, या तिन्ही पक्षाने युती केल्यास बंडखोरी व अपक्ष उमेदवार अर्ज जास्त दाखल होऊ शकतात गेल्या ४ दिवसात विक्री झालेल्या अर्जाची एकुण संख्या २ हजार ४८७ वर पोहोचली असून, प्रत्यक्ष अर्ज दाखल करण्यासाठी झुंबड उडाली आहे.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार (ता. २७) १ ते १६ प्रभागासाठी ३९२ अर्जाची विक्री झाली. दि. २३ डिसेंबरपासून सुरु झालेल्या या प्रक्रियेत आतापर्यंत २ हजार ४८७ संच इच्छुकांनी खरेदी केले आहेत. प्रभागनिहाय राजकीय चुरस वाढत असल्याने इच्छुकांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे. आज ३४ अर्ज प्राप्त सुरुवातीचे काही दिवस केवळ अर्जाची विक्री होत असताना आता प्रत्यक्ष अर्ज भरण्याकडे प्रभागातून एकुण ३४ नामनिर्देशन पत्रे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे प्राप्त झाली आहेत. यासह आतापर्यंत दाखल झालेल्या एकुण अर्जाची संख्या ४८ झाली आहे. उद्या सुट्टी- दि. २८ डिसेंबर रोजी रविवार असल्याने अर्ज विक्री आणि स्विकृती बंद राहणार असून, दि. ३० डिसेंबर ही अर्ज भरण्याची अंतिम तारीख असेल. वेळेची मर्यादा - दि. ३० डिसेंबर रोजी दुपारी २ वाजेपर्यंतच कडे नवीन अर्जाची विक्री केली जाणार असून, भरलेले अर्ज दुपारी ३ वाजेपर्यंतच स्विकारले जातील. इच्छुकांनी वेळेची ही मर्यादा पाळून आपले अर्ज वेळेत दाखल करावेत, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.प प्रशासकीय' देखरेख कायम जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली पाचही निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात चोख व्यवस्था ठेवण्यात आली आहे. प्रत्येक अर्जाची तांत्रिक बाजू आणि आचारसंहितेचे पालन यावर प्रशासन बारकाईने लक्ष ठेवून आहे. पारदर्शक निवडणुकीसाठी यंत्रणा सज्ज असल्याची माहिती निवडणूक कक्षाकडून देण्यात आली आहे.

# राष्ट्रीय महामार्गासाठी अतिक्रमण नोटिसा; मोबदला रखडल्याने भोरमध्ये संताप

**भोर । प्रतिनिधी**

पंढरपूर- शिंदेवाडी- भोर- महाड या राष्ट्रीय महामार्गाचे काम प्रगतीपथावर असताना भोर नगरपरिषदेने महामार्गाच्या हद्दीतील अतिक्रमणे काढून घेण्याबाबत मालमत्ताधारकांना नोटिसा दिल्या आहेत. मात्र, रस्त्यासाठी गेलेल्या जागेचा मोबदला अद्याप मिळालेला नसल्याने रामबाग ते महाड नाका परिसरातील नागरिकांनी तीव नाराजी व्यक्त केली आहे. या मागणीसाठी नागरिकांनी शुक्रवारी (दि. २६) भोर मुख्याधिकारी गजानन शिंदे यांची भेट घेऊन निवेदन दिले.

पुणे-सातारा महामार्गावरील शिंदेवाडी (ता. खंडाळा, जि. सातारा) ते वरंधा घाट-महाड हा मार्ग राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित करण्यात आला असून, या मार्गाचे सिमेंट काँक्रीटचे काम सध्या सुरू



आहे. या महामार्गाच्या भोर नगरपरिषदेच्या हद्दीतील रामबाग ते महाड नाका या टप्प्यातील अतिक्रमणे काढून घेण्याचे आदेश नगरपालिका प्रशासनाने दिले आहेत. रस्त्याच्या हद्दीपासून इमारत रेषा व नियंत्रण रेषा ३ ते ६ मीटर अंतरावर असणे बंधनकारक असल्याने या मर्यादेतील अतिक्रमणे हटविण्याचा उल्लेख नोटिसांमध्ये करण्यात आला आहे. मात्र, या परिसरातील अनेक रहिवाशांना रस्त्यासाठी गेलेल्या जागेचा मोबदला अद्याप मिळालेला नाही, अशी तक्रार नागरिकांनी केली आहे. चौपाटी व रामबाग परिसरातील नागरिकांनी मुख्याधिकारी गजानन शिंदे यांची भेट घेऊन आपल्या अडचणी मांडल्या. या वेळी संजय गोळे, चंद्रकांत राजीवडे, युवराज शेटे, सविता कोठावळे, नीलेश देशमाने, शुभम शेटे, बाळासाहेब देशमाने, प्रसाद देशमाने आदी उपस्थित होते. नागरिकांनी सांगितले की, काही घरे १०० वर्षांहून अधिक जुनी असून राष्ट्रीय महामार्गाच्या आखलेल्या सीमारेषेमुळे ती पाडण्याची वेळ येणार आहे. तसेच काही ठिकाणी रस्त्यासाठी जागा अधिग्राहित करण्यात आली असली तरी त्याचा मोबदला मिळालेला नाही. शिवाय प्रॉपर्टी कार्डमध्ये संबंधित जागा अद्याप नागरिकांच्याच नावावर असल्याचे दिसून येते. जर मोबदला देण्यात आला असेल, तर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे नाव प्रॉपर्टी कार्डवर का नोंदवले गेले नाही, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला. मोबदला दिला असल्याचे पुरावे असल्यास त्याची कागदपत्रे नागरिकांना उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणीही या वेळी करण्यात आली.

# साखर उताऱ्यात श्री छत्रपती कारखान्याची बाजी

भवानीनगर: यावर्षीच्या गाळप हंगामामध्ये श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याने माळेगाव सहकारी साखर कारखान्याला साखर उताऱ्यात मागे टाकून आघाडी घेतली आहे. माळेगाव सहकारी साखर कारखान्यापेक्षा ०.१६ टक्के जास्त साखर उतारा श्री छत्रपती कारखान्याने मिळवला आहे.

साखर कारखान्यांचा गाळप हंगाम सुरू झाला की जिल्ह्यातील सोमेश्वर, माळेगाव व श्री छत्रपती या साखर कारखान्यांच्या गाळपाकडे ऊस उत्पादकांचे लक्ष लागते. जिल्ह्यामध्ये सहकारी साखर कारखान्यांमध्ये सोमेश्वर, माळेगाव आणि श्री छत्रपती कारखाना हे तीन साखर कारखाने उसाचे गाळप, साखर उत्पादन व साखर उतारा मिळवणे यामध्ये आघाडीवर असतात. त्यामुळे या साखर कारखान्यांकडे ऊस उत्पादकांचे लक्ष लागलेले असते. साखर उताऱ्यामध्ये



मागील अनेक वर्षापासून नेहमीच पिछाडीवर असणाऱ्या श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याने यावर्षी माळेगाव साखर कारखान्यापेक्षा जास्त साखर उतारा मिळवून जिल्ह्यामध्ये दुसऱ्या क्रमांक मिळावला आहे. साखर उताऱ्याच्या बाबतीत सोमेश्वर कारखाना जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांकावर असून या कारखान्याने सरासरी ११.१० टक्के साखर उतारा मिळवलेला आहे. श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याने साखर उताऱ्यामध्ये दुसऱ्या क्रमांकाची आघाडी मिळवत १०.८५ टक्के सरासरी साखर उतारा मिळवला आहे. गाळप हंगामाच्या सुरुवातीला माळेगाव सहकारी साखर कारखाना साखर उताऱ्यामध्ये दुसऱ्या क्रमांकावर होता, परंतु डिसेंबर महिन्यामध्ये श्री छत्रपती कारखान्याने साखर उताऱ्यामध्ये आघाडी घेत डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात माळेगाव कारखान्यापेक्षा ०.१६ टक्क्याने साखर उतारा जास्त मिळवला आहे. माळेगाव कारखान्याने १०.६९ टक्के सरासरी साखर उतारा मिळवला आहे. जास्तीत-जास्त साखर उतारा मिळवण्यासाठी सोमेश्वर सहकारी साखर कारखाना व श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना यांच्यामध्ये स्पर्धा निर्माण झालेली आहे. श्री छत्रपती कारखान्यापेक्षा सोमेश्वर कारखान्याचा साखर उतारा ०.२५ टक्क्याने जास्त आहे. श्री छत्रपती कारखान्याची जास्तीत-जास्त साखर उतारा मिळवण्याची घोडदौड जोरात सुरू असून, आता लवकरच श्री छत्रपती कारखाना सोमेश्वर कारखान्याच्या साखर उताऱ्याच्या जवळ येणार आहे. २८ डिसेंबरला सोमेश्वर कारखान्याला दैनंदिन साखर उतारा ११.९८, माळेगाव कारखान्याला दैनंदिन साखर उतारा ११.८५ व श्री छत्रपती कारखान्याला दैनंदिन साखर उतारा ११.५९ मिळाला आहे.

# पुण्यात तलवारीच्या धाकाने १.५ कोटींची लूट, दरोडेखोर झाडीत पसार

**पुणे । प्रतिनिधी**

खडकवासला-पानशेत रस्त्यावर असलेल्या खानापूर येथील एका सराफी पेढीवर सशस्त्र दरोडा टाकून चोरट्यांनी १४४ तोळे सोन्याचे दागिने, २० हजारांची रोकड असा एक कोटी ४३ लाख ५७ हजार रुपयांचा ऐवज लुटून नेल्याची घटना घडली. याप्रकरणी पाच ते सहा दरोडेखोरांविरुद्ध हवेली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका महिलेने हवेली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याप्रकरणी पाच ते सहा दरोडेखोरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पसार झालेल्या दरोडेखोरांना पकडण्यासाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत.पानशेत रस्त्यावर खानापूर येथे सराफी पेढी आहे. दुपारी साडेबाराच्या सुमारास पाच ते सहा दरोडेखोर सराफी पेढीत शिरले. दरोडेखोरांनी त्यांचे चेहरे रुमालाने झाकले होते. दरोडेखोरांकडे कोयते, तलवारी होत्या. सराफी पेढीतील कर्मचाऱ्यांना शस्त्राचा धाक दाखवून दरोडेखोरांनी ११४ तोळे सोन्याचे दागिने, गल्ल्यातील २० हजारांची रोकड असा एक कोटी




४३ लाख ५७ हजार रुपयांचा ऐवज लुटून नेला.या घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय अधिकारी सुनीलकुमार पुजारी, पोलीस निरीक्षक वैशाली पाटील, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी सराफी पेढीतील चित्रीकरण तपासले असून, पसार झालेल्या चोरट्यांचा माग काढण्यात येत आहे. पोलिसांनी खानापूर परिसरातील ग्रामस्थांची चौकशी केली. दरोडा टाकल्यानंतर चोरटे दाट झाडीतून पसार झाल्याची माहिती ग्रामस्थांनी पोलिसांना दिली.

# राज्य वकील परिषदेचे नेतृत्व पुन्हा पुण्याच्या हाती ; ज्येष्ठ वकील हर्षद निंबाळकर यांची बिनविरोध निवड

**पुणे । प्रतिनिधी**

ज्येष्ठ वकील हर्षद निंबाळकर यांची महाराष्ट्र आणि गोवा वकील परिषदेच्या अध्यक्षपदी तिसऱ्यांदा बिनविरोध निवड झाली आहे. निंबाळकर हे १९८४ पासून पुणे जिल्हा व सत्र न्यायालयात प्रॅक्टीस करत आहेत.



गेल्या चार दशकांहून अधिक काळातील त्यांचा अनुभव आणि वकिलांच्या प्रश्नांसाठीची सातत्यपूर्ण लढाई यामुळे त्यांना परिषदेमध्ये मानाचे स्थान मिळाले आहे. ते पुणे बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष असून, २००४ पासून परिषदेत निवडून आलेले सदस्य आहेत. जुलै २०२४ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने त्यांना 'ज्येष्ठ वकील' म्हणून पदनाम दिले आहे. हे पदनाम मिळवणारे ते पुण्यातील पहिले वकील ठरले आहेत. शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. ते टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या विधी विभागाचे अधिष्ठाता (डीन) म्हणून कार्यरत आहेत. वकिलांच्या हितासाठी त्यांनी अनेक परिषदांचे, चर्चासत्रांचे आणि प्रशिक्षण उपक्रमांचे आयोजन केले आहे. तरुण वकिलांसाठी मार्गदर्शन, ज्येष्ठ वकिलांच्या प्रश्नांवर तोडगा आणि बार-बेंच संबंध दृढ करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. यापूर्वी परिषदेच्या अध्यक्षपदी ड. अहमद खान-पठाण यांची नियुक्ती झाली होती.

# राजगड तालुक्यात चौशिंग्या हरिण शिकार प्रकरणी वनविभागाकडून चार जणांना अटक; आरोपींकडून हत्यारे व मांस जप्त!

**पुणे । प्रतिनिधी**

आंबेगाव वनपरिमंडळातील वेल्हा वनपरिक्षेत्र अंतर्गत येणाऱ्या ओसाडे (ता.राजगड) येथे वन्यप्राण्यांची शिकार केल्याप्रकरणी वनविभागाने मोठी कारवाई करत चार शिकाऱ्यांना ताब्यात घेतले आहे. ही कारवाई रविवार (ता.२९) रोजी करण्यात आली असून न्यायालयात हजर केले असता आरोपींना पाच दिवसाची पोलीस कोठडी दिली असल्याची माहिती राजगड तालुक्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी अनिल लांडगे यांनी दिली.

समीर वसंत पिलाणे व गणेश बबन लोहकरे दोघेही (रा. ओसाडे,ता.राजगड), नवनाथ चंद्रकांत पवळे (रा. सोनापूर) आणि पांडूरंग दत्तात्रय कदम (रा. निगडे मोसे) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. अटक



करण्यात आलेल्या आरोपींमध्ये आरोपींकडून चौसिंगा या वन्यप्राण्याचे मांस व शिकार करण्यासाठी वापरण्यात आलेली हत्यारे जप्त करण्यात आली आहेत.

या प्रकरणी वनरक्षक राजेंद्र निंभोरे यांनी फिर्याद दिली आहे. यावरून वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ मधील कलम २(१), ९, ४८(ए), ४९, ५० व ५१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा अजामीनपात्र व दाखलपात्र गुन्हा नोंदवण्यात आला आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी अनिल लांडगे यांनी वन्यप्राण्यांच्या संरक्षणासाठी अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा दिला आहे. ही कारवाई पुणे वनविभागाचे उपवनसंरक्षक महादेव मोहिते व शीतल राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली अनिल लांडगे वन परिमंडळ अधिकारी स्मिता अर्जुन, दया डोमे, वैशाली हाडवळे ,मंजुषा घुगे ,वनरक्षक राजेंद्र निंभोरे, ए.आर.सोनकांबळे, एस.एन.कांबळे, यांच्यासह इतर वेल्हा वनपरिक्षेत्रातील संयुक्त पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# शांताई अर्बन दिनदर्शिका प्रकाशन सोहळा अनेक दीगजाच्या उपस्थितीत साजरा

बीड । प्रतिनिधी

दरवषी प्रमाणे या ही वर्षी शांताई अर्बन दिनदर्शिका प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता प्रकाशनासाठी सर्व खातेदार संचालक पिग्मी एजंट सभासद उपस्थित होते. सामान्य माणसापर्यंत दिनदर्शिका पोहचवण्याचां मानस आहे असे मत शांताई अर्बन चे अध्यक्ष डॉ.डी बी शिंदे सर यांनी मांडले तसेच छोट्या उदयोग धंद्यांना शांताई अर्बन मुळे मदत होते असे मत सांगताय.

शांताई अर्बनच्या दिनदर्शिका प्रकाशनाला आवर्जून उपस्थित मान्यवर आरोग्य क्षेत्रातील नामवंत डॉ. शेंडगे सर सपत्नीसह, डॉ.मितेश गवते




डॉ. एकनाथ पवार सर डॉ. मनोज मुंडे सर डॉ.देशपांडे सर तसेच नवनिश्चित नगरपरिषद सदस्य संजय भाऊ उडान ,नंदू पिंगळे ,युवा उद्योजक अमित शिराळे ,प्रवीण सुरवसे,बाळू घोडके,रोहित जाधव,राज शिराळे, गणेश चव्हाण,बाबू मुने,जयंत वाघ, प्रवीण मुळूक, मुन्ना नाईक, नितीन काळे सर, अतुल डाके इत्यादी अनेक मान्यवर व खातेदारांची उपस्थिती होती

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर शिंदे उपाध्यक्ष संदीप वाघमारे संचालक मंडळ परमेश्वर शिंदे साईनाथ वाघमारे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.संस्थेच्या प्रगतीचा आलेख, सामाजिक उपक्रम, तसेच सभासद व ग्राहकांसाठी उपयुक्त माहिती या दिनदर्शिकेत समाविष्ट करण्यात आली आहे. ग्राहकांचा विश्वास हेच संस्थेचे भांडवल असून पारदर्शक व विश्वासार्ह सेवा देण्याची परंपरा कायम ठेवली जाईल, असे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले. दिनदर्शिकेच्या प्रकाशनानंतर उपस्थितांनी शताई अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अहिल्यानगरमध्ये युवा सेनेच्या जिल्हाप्रमुखावर रिव्हॉल्वरने जीवघेणा हल्ला ; गुन्हा दाखल

अहिल्यानगर । प्रतिनिधी

एमआयडीसी येथील सनफार्मा चौक परिसरात भरदिवसा थरारक प्रकार घडत सामाजिक कार्यकर्ते तथा युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे यांच्यावर रिव्हॉल्वर व कोयत्याने जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणी चिरंजीव दत्तात्रय गाढवे (रा. बोल्हेगाव फाटा, एमआयडीसी) व त्याच्या चार अनोळखी साथीदारांविरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना शनिवार, दि. २७ डिसेंबर रोजी सकाळी साडेनऊ ते दहाच्या सुमारास घडली. गलांडे यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. योगेश गलांडे यांचे आरोपी चिरंजीव गाढवे यांच्याशी पूर्वीपासून ओळख असून जुन्या वादातून त्यांच्यात तणाव होता. शनिवारी सकाळी योगेश गलांडे हे त्यांच्या चारचाकी वाहनातून (एम.एच. १६ बी.वाय. ०००९) घरातून गजानन कॉलनी, नवनागापूर येथील स्वराज्य कामगार संघटनेच्या कार्यालयाकडे निघाले होते. वाहन चालवित असताना त्यांचा पुतण्या वैष्णव गणेश गलांडे हा चालक होता.सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास सनफार्मा चौक येथे समोरून एक निळ्या रंगाची, विना नंबरची बलेनो कार आडवी आली. त्या कारमधून चार इसम उतरले. त्यापैकी दोघांच्या हातात कोयते होते. त्यांनी गलांडे यांच्या वाहनाला चारही बाजूंनी घेराव घातला. दरम्यान, बलेनो कारच्या पुढील सीटवर बसलेला आरोपी चिरंजीव गाढवे याने हातातील रिव्हॉल्वर दाखवत योगेश गलांडे यांना "तू फार माजलाय, तुला आज जिवंत सोडणार नाही," अशी जीवे मारण्याची धमकी दिली. यानंतर आरोपीने आपल्या साथीदारांना "आज यांना सोडायचे नाही," असे सांगितले. त्यावर आरोपींच्या साथीदारांनी कोयत्याने योगेश गलांडे व वैष्णव गलांडे यांच्यावर वार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रसंगावधान राखत वैष्णव गलांडे यांनी वाहन मागे घेतले. तरीही कोयत्याचे वार वाहनाच्या समोरील काच व बोनेटवर झाले. तसेच वाहनाच्या पाठीमागील काचेवरही कोयत्याचा वार होऊन मोठे नुकसान झाले. हल्लेखोरांनी पुन्हा वाहनावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र चालकाने प्रसंग ओळखून वाहन वेगात काढत जीव वाचवला. तेथून निघून जात असताना आरोपी चिरंजीव गाढवे याने "आज वाचलास, पुन्हा माझ्या हाती लागलास तर तुला जिवे ठार मारीन," अशी पुन्हा धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या थरारानंतर योगेश गलांडे व त्यांचे पुतणे थेट एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल झाले. त्यांच्या फिर्यादीवरून चिरंजीव दत्तात्रय गाढवे व त्याच्या चार अनोळखी साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

BEED PRARAMBH Newspaper Prin ed, Published and Owned by Jalinder Dnyandev Dhande and Printed at TULJABHAVANI PRINTERS, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) and published at BEED PRARAMBH OFFICE, C/o Dnyandev Dhande, Sant Namdeo Nagar, Beed, Tq. Beed Dist.Beed Pin - 431122 (Maharashtra) Editor : Jalinder Dnyandev Dhande

बीड प्रारंभ हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक जालिंदर ज्ञानदेव धांडे यांनी तुळजाभवानी प्रिंटर्स, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड प्रारंभ कार्यालय, द्वारा - ज्ञानदेव धांडे, संत नामदेवनगर, बीड, ता.बीड जिल्हा - बीड पिन - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.संपादक : जालिंदर ज्ञानदेव धांडे






सायं.दैनिक **बीड प्रारंभ**

मंगळवार दि. ३० डिसेंबर २०२५









# कला महोत्सवामुळे विद्यार्थ्यांमधून कलाकार निर्माण होतील -भीमराव धोंडे

## आत्मविश्वास आणि सातत्य हाच यशाचा खरा मार्ग -सुप्रसिद्ध अभिनेत्री हेमांगी कवी

कडा । प्रतिनिधी

राज्यस्तरीय गंगाई बाबाजी रौप्य कला महोत्सवाच्या माध्यमातून आष्टी सारख्या ग्रामीण भागातील युवकांमधून कलाकार निर्माण होण्यास मदत होईल, आई- वडिलांच्या त्यागाची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांनी सातत्याने प्रगती करावी असे प्रतिपादन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले. आष्टी येथील भगवान महाविद्यालयात आयोजित राज्यस्तरीय गंगाई बाबाजी रौप्य कला महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते.

राज्यस्तरीय कला रौप्य महोत्सवाच्या निमित्ताने सकाळी आष्टी शहरातून भव्य रॅली काढण्यात आली. याप्रसंगी व्यासपीठावर सिनेअभिनेत्री हेमांगी कवी,सौ. दमयंतीताई धोंडे, युवानेते अजयदादा धोंडे,सौ. अक्षताताई धोंडे,अभयराजे धोंडे,चेअरमन राजुकाका धोंडे, जि.प.चे माजी सदस्य सतिश शिंदे, माजी सभापती नियामत बेग, किशोरनाना हंबर्डे,धैर्यशील थोरवे, ॲड.रत्नदीप निकाळजे, रिपाईचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, हरिभाऊ जंजिरे, सरपंच अशोक मुळे, पसभापती पांडुरंग नागरगोजे, आण्णासाहेब भोसले,ह.भ.प. दिनकर महाराज तांदळे,पत्रकार भगवान राऊत,उत्तम बोडखे, दिलीप काळे,सरपंच सावता ससाणे,संतोषभैया चव्हाण, अश्ताक शेख,स्वामी सानप,अज्जुभाई शेख,प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, प्राचार्य सुरेश बोडखे,भाग्यश्री राऊत,सरपंच दादासाहेब जगताप, प्रा.अल्लाउदिन सय्यद, युवराज वायभासे, आदेश निमोणकर संस्थेचे सर्व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.



पुढे बोलताना माजी आ. भीमराव धोंडे यांनी सांगितले की,ग्रामीण भागातील मुलांच्या अंगी भरपूर वेगवेगळे कलागुण असतात.या महोत्सवाच्या माध्यमातून अशा कलागुणांना वाव मिळण्याची संधी आहे. कष्टकरी आणि गोरगरिबांची मुले कला क्षेत्राकडे वळावेत या हेतूने गेल्या २५ वर्षापासून गंगाई बाबाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. ग्रामीण भागात मुले शिकुन उच्च शिक्षित व्हावेत. आपला परिसर हा दुष्काळी आहे उच्च शिक्षण घेतले तर नौकरी व्यावसायाच्या माध्यमातून प्रगती करता येईल. महोत्सवाच्या माध्यमातून कलाकार निर्माण होतील. जिवनात कष्टाशिवाय यश मिळत नाही. आई वडिलांना आपले पालनपोषण करण्यासाठी खुप कष्ट करावे लागले. आपणही तेच न करता भरपूर शिक्षण घेऊन नियमित अभ्यास करावा व आई वडिलांचे नावलौकिक करावे. दिवसातील पाच तास चांगला मन लावून अभ्यास केला तर स्पर्धा परिक्षेत यश निश्चितच मिळते.भावी पिढीतून चांगले कलावंत घडावी हाच महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे. इंग्रजी भाषेत किर्तन प्रवचन करण्यासाठी जुन महिन्यापासुन त्या शिक्षणाची सोय करण्यात येईल.जेणेकरून आपल्या भागातील विद्यार्थी इंग्रजी भाषेत अध्यात्मिक शिक्षण घेऊन देशभरात व परदेशात किर्तन प्रवचन करतील. प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना अभिनेत्री हेमांगी कवी यांनी सांगितले की,थोर महापुरुषामुळे आपण येथे आहोत दुष्काळी आणि एवढ्या ग्रामीण भागात माजी आ. भीमराव धोंडे यांनी शिक्षणाची गंगा आणली ही बाब खरोखरच कौतुकास्पद आहे. माझ्या अभिनयापेक्षा

# ‘महाविस्तार’ एआय ॲपद्वारे शाश्वत शेती करा - कृषी अधिकारी शेख व मोहोळकर यांचे आवाहन






**मादळमोही । प्रतिनिधी**

मा. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. सुभाष साळवे तसेच तालुका कृषी अधिकारी श्री. सचिन गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ कृषी अधिकारी कु. माधुरी माळी व उप कृषी अधिकारी श्री. संदीप देशमुख, श्री. राजेंद्र सांगळे यांच्या सहकार्याने गेवराई तालुक्यात शेतकरी मेळावे व गाव बैठका घेऊन ‘महाविस्तार’ एआय ॲपचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात येत आहे. तालुक्यातील विशेषतः मादळमोही ▶▶ पान २ वर...

## जयसिंह सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजी जिल्हा परिषद सभापती तथा युवकांचे प्रेरणास्थान जयसिंह सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते सुंदर सोळंके यांनी केले आहे.



धारूर तालुक्यातील हिंगणी येथील ग्रामपंचायत सदस्य तथा जिल्हा परिषद शाळेचे शालेय व्यवस्थापन समिती सदस्य सतत सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. माझी जि.प. सभापती व सुंदरराव सहकारी साखर कारखाना व्हॉइस चेअरमन जयसिंह सोळंके यांचा मंगळवारी वाढदिवसाचे औचित्य साधत सुंदर सोळंके यांनी ढेकणमोहा येथील पसायदान अनाथालयातील मुलांना अन्नदानाचा उपक्रम राबवत हिंगणी येथील गरजू मुलांना गणवेश व शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. त्याचप्रमाणे चांगल्या प्रतीची वृक्ष लागवड मंगळवारी हिंगणी येथे करण्यात येणार असून या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन सुदर्शन उर्फ सुंदर सोळंके यांनी केले आहे. नेत्याच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम राबवल्यामुळे सोळंके यांचे कौतुक होत आहे.

# प्रत्येक जिनिंगवर शेतकऱ्यांच्या कापूस ऑनलाईन प्रक्रियेची व्यवस्था करा-आमटे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा हा कापूस व सोयाबीन पिकासाठी ओळखला जातो. मात्र सीसीआयकडे कापूस विक्रीसाठी आवश्यक असलेली ऑनलाईन प्रक्रिया शेतकऱ्यांना स्वतः करता येत नसल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे प्रत्येक जिनिंगवर शेतकऱ्यांच्या वतीने ऑनलाईन नोंदणी, सातबारा अपलोड, बाजार समितीची संमती व स्लॉट बुकिंग ही संपूर्ण प्रक्रिया जिनिंगमार्फतच करून देण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे यांनी केली आहे.



तसेच बीड जिल्ह्याच्या ठिकाणी चार्जिंगला मान्यता असतानाही एकही जिनिंग पूर्णवेळ सुरू नाही, ही गंभीर बाब आहे. यामुळे शेतकऱ्यांना कापूस विक्रीसाठी माजलगाव, केज, धारूर अशा दूरच्या ठिकाणी जावे लागत असून वेळ, खर्च व त्रास वाढत आहे. माजलगाव मध्ये आठ जिंनिग पूर्ण वेळ सुरु आहेत मग बीड जिल्ह्याच्या ठिकाणी एक हि जिंनिग पूर्णवेळ सुरू का नाही?

सीसीआय प्रशासनाने तात्काळ बीड येथील जिंनिंग पूर्णवेळ सुरू कराव्यात, जेणेकरून शेतकऱ्यांची होणारी हेळसांड थांबेल, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. ही मागणी राजेंद्र आमटे, गणेश ढवळे,अशोकरावजी येडे, अर्जुन सोनवणे, राहुल साळुंखे, खाजाभाई पठाण, दिलीप शिंदे, विक्रम शिंदे, रमेश गुंड, नानासाहेब कडबाने, मोहन गव्हाणे, संपत गव्हाणे, राजू गायके, सुहास जायभाय, गणेश नाईकवाडे, राजू वीर, किरण सोळुंके, राजू सोळुंके, श्रीराम खुरणे, गोविंद तीपाले, महेंद्र तीपाले, गोरख टेकाळे आदी शेतकरी बांधवांच्या वतीने करण्यात आली आहे.

# तेली समाजभूषण राज रायते यांच्या गायनाच्या तालावर गडचिरोलीकर थिरकले

**बीड । प्रतिनिधी**

२७ डिसेंबर रोजी श्री संताजी जगनाडे महाराज जन्मोत्सव समिती, गडचिरोली तेली समाज बांधव आयोजित सुप्रसिद्ध गायक, तेली समाजभूषण राज प्रल्हादराव रायते यांचा भव्य गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी राज याच्या गायनाने गडचिरोलीकर अक्षरशा थिरकताना दिसले.

कार्यक्रमाच्या आधी गायक राज रायते यांचा मोठ्या उत्साहात सत्कार समारंभ पार पडला. यावेळी महाराष्ट्र प्रांतीक तेली समाज अध्यक्ष गडचिरोली



प्रभाकर वासेकर तसेच नगराध्यक्ष योगिताताई पिंपरे व अनेक प्रमुख मान्यवर मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. गायक राज रायते यांच्या गायनाच्या कार्यक्रमात रसिक प्रेक्षकांनी मनमुराद आनंद घेतला. यावेही मंत्रमुग्ध झालेल्या रसिकांनी राज रायते यांच्या गायनावर जल्लोष करताना चांगलाचा ताल धरल्याचे दिसून आले. श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्यावर आधारित असलेले राज रायते यांचे सुप्रसिद्ध गीत या ठिकाणी सादर करण्यात आले. या गीताला संपूर्ण तेली समाज बांधवांनी खूप मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. राज यांची संपूर्ण टीम या ठिकाणी उपस्थित होती. यामध्ये त्यांचे वडील प्रल्हाद रायते तसेच वाद्यवृंद गुरु सचिन राऊत, पवन शिंदे, संजय कागदे, आणि विजय कोरडे उपस्थित होते. वाद्यवृंदांनीही आपल्या सुमधुर कलाने रसिकांचे मन जिकले. कार्यक्रम संपल्यानंतर राज रायते यांना भेटण्यासाठी प्रचंड गर्दी या ठिकाणी पाहवयास मिळाली. विदर्भातून राज रायते यांचे चाहते या कार्यक्रमास उपस्थित राहिले होते. बीडचा उभराता गायक म्हणून राज रायते याच्याकडे बघितले जात आहे. दिवसेंदिवस त्याला मिळणारी प्रसिद्धी आणि प्रगती दखल घेण्यासारखी आहे.

# अवैध वाळू उपसा करणाऱ्या दोघांविरुद्ध कारवाई

## एरंडगाव येथे जेसीबी ट्रॅक्टरसह वाळू साठा जप्त

बीड । प्रतिनिधी

सिंदफणा नदीपात्रामध्ये चोरट्या पध्दतीने सुरु असलेल्या अवैध वाळू उपशावर कारवाई केलेबाबत

पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी बीड जिल्ह्यामधील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी, अंमलदार यांना आदेशित केले होते. त्याच अनुशंगाने अवैध धंद्यांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन गेवराई परीसरातील पाचेगाव बीट हद्दीमध्ये




दिनांक २७/१२/२०२५ रोजी सुरु असलेल्या पेट्रोलिंग दरम्यान पोलीस स्टेशन गेवराई येथील पोलीस पथकास गोपनिय माहिती मिळाली की, एरंडगाव शिवारातील सिंदफणा नदीपात्रामध्ये विनापरवाना जेसीबी मशीनचे सहाय्याने चोरुन वाळु उपसा सुरु असुन ट्रॅक्टरद्वारे तो विक्रीच्या उद्देशाने घेवुन जात आहेत अशी खात्रीशीर माहिती मिळाल्यावरुन एरंडगाव, ता-गेवराई शिवारातील सिंदफणा नदीपात्रामध्ये अवैध चोरीचा वाळु उपशावर दुपारी ०४.३० वा चे सुमारास रेड केली असता सदर ठिकाणी ट्रॅक्टर चालक परीक्षीत कल्याणराव पाटील, वय-३१ वर्षे, धंदा-शेती, रा-कुर्ला, ता, जि-बीड व जेसीबी मशिन चालक शुभम महादेव कानडे, वय-२० वर्षे, धंदा-चालक, रा-ब-हाणपुर, ता, जि-बीड यांचे ताब्यातुन निळ्या रंगाचे एक सोनालिका कंपनीचे ट्रॉलीसह ट्रॅक्टर किंमत ८,००,०००/-रु, त्याचेमध्ये ▶▶ पान २ वर...

# महावितरणचा ‘शॉक’! सहा महिन्यांपासून जातेगावचा फिडर बंदच

## शितल धोंडरे यांचा आंदोलनाचा इशारा

### प्रशासकीय दिरंगाईचा कळस; ग्रामस्थांच्या नुकसानीला जबाबदार कोण? ७ दिवसांचा अल्टिमेटम

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील जातेगाव (ता. गेवराई) येथील ग्रामस्थांच्या हक्काचा 'गावठाण फिडर' महावितरणच्या फाईलमध्ये अडकून पडला आहे. काम पूर्ण होऊन सहा महिने उलटले तरी फिडर चार्ज न केल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला जिल्हा कार्याध्यक्षा श्रीमती शितल धोंडरे यांनी महावितरण प्रशासनाला धारेवर धरले आहे. जनतेच्या पैशाची उधळपट्टी करून यंत्रणा उभी केली, मग ती सुरू करायला मुहूर्त कोणाचा पाहत आहात? असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

यंत्रणा असूनही गाव अंधारात

जातेगाव येथील ३३/११ केव्ही उपकेंद्रात गावठाण फिडरचे काम तांत्रिकदृष्ट्या पूर्ण झाले आहे. मात्र, महावितरणच्या स्थानिक अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे हा फिडर कार्यान्वित करण्यात आलेला नाही. परिणामी, संपूर्ण गावाचा भार जुन्या यंत्रणेवर येत



असून 'लो-व्होल्टेज'मुळे नागरिकांचे घरगुती संसारोपयोगी साहित्य (टीव्ही, फ्रिज, एसी) निकामी होत आहेत. वारंवार होणाऱ्या ट्रिपिंगमुळे ग्रामस्थ हैराण झाले असून महावितरणविरुद्ध संतापाची लाट उसळली आहे.

यात्रा काळात गोंधळ उडण्याची शक्यता

येत्या काही दिवसांत जातेगावचा ऐतिहासिक ग्रामदैवत यात्रा उत्सव संपन्न होणार आहे. या यात्रेला हजारो भाविक हजेरी लावतात. अशा मोठ्या गर्दीच्या ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाल्यास अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सुरक्षेच्या दृष्टीने हा फिडर तातडीने कार्यान्वित करणे गरजेचे असतानाही प्रशासन डोळे झाकून बसले आहे, असा आरोप शितल धोंडरे यांनी केला. ▶▶ पान २ वर...

# जिल्ह्यात पहिल्यांदाच फक्त २ दिवसांच्या, १.५ किलो वजनाच्या बाळावर यशस्वी शस्त्रक्रिया

## श्री सिद्धिविनायक सुपरस्पेशियालिटी हॉस्पिटलमधे आता नवजात व बाल शस्त्रक्रिया विभाग देखील सुरू

बीड । प्रतिनिधी


बीड जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानास्पद ठरणाऱ्या एका ऐतिहासिक वैद्यकीय यशामध्ये, फक्त २ दिवसांचे, १.५ किलो वजनाचे अकाली (प्रीटर्म) बाळ यांच्यावर ॲनोरेक्टल मालफॉर्मेशन (गुदद्वार न उघडणे) या गंभीर जन्मजात आजारावर बीडमध्ये प्रथमच यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली.

ही ऐतिहासिक शस्त्रक्रिया बीड शहरातील श्री सिद्धिविनायक सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, शासकीय विश्राम गृह शेजारी, नगर रोड बीड येथे पार पडली.

या रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. एकनाथ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही अतिशय गुंतागुंतीची व नाजूक बालशस्त्रक्रिया प्रसिद्ध बालशल्यचिकित्सक एमसीएच सर्जन डॉ. नागेश उंदरे यांनी अत्यंत कौशल्याने पार पाडली. शस्त्रक्रियेदरम्यान सुरक्षित व दक्ष भूल व्यवस्थापन भूलतज्ज्ञ डॉ. तुकाराम बडे यांनी केले. यावेळी या रुग्णालयातील आरएमओ डॉ. झिशान मोमीन, ओटी तंत्रज्ञ दयानंद राठोड, शिवाजी वांडरे, राम मंदे यांनी महत्वाची भूमिका बजावली.

बाळाची शस्त्रक्रियेनंतर प्रकृती स्थिर असून समाधानकारक सुधारणा होत आहे. अधिक उपचारांसाठी बाळाला याच रुग्णालयाच्या छखउण मध्ये भरती केले आहे.

ही कामगिरी वैद्यकीय क्षेत्रात सर्वत्र कौतुकास्पद ठरत असून, बीडच्या आरोग्यसेवेसाठी हा एक अभिमानाचा व ऐतिहासिक क्षण मानला जात आहे.बीड जिल्ह्यात अद्ययावत व प्रगत अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी श्री सिद्धिविनायक सुपरस्पेशियालिटी हॉस्पिटल ओळखले जाते. या रुग्णालयात कर्करोग , किडनी, हृदयरोग व कॅथलॅब, नेत्ररोग, कान नाक घसा, जॉइंट रिप्लेसमेंट, मणक्यांचे आजार, छातीरोग, अशा विविध एक ना अनेक आजारावर उपचार व शस्त्रक्रिया आधीपासूनच विविध शासकीय योजनेतून मोफत करण्यात येत आहेत. आता नवजात व बाळांसाठी शस्त्रक्रिया विभाग सुरू करून त्यासाठी आवश्यक सर्व आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या ▶▶ पान २ वर...



# आनंदग्राम हे मानवतेचे जिवंत विद्यापीठ.....!



२५ वर्षांपूर्वी एड्स या भयानक रोगाशी झुंज देणाऱ्या, समाज बहिष्कृत, निष्पाप चिमुकल्यांना उराशी बिलगत संध्या आणी दत्ता बारगजे यांनी आई-वडिलांचे प्रेम देऊन वाढवले.

मी स्वाराती मध्ये औषध वैद्यक शास्त्राचा प्रमुख आहे. एचआयव्ही रोगापेक्षा जिवंतपणे या पिडीतांनी कुटुंबाचे सोसलेले चटके मी जवळून पाहिले आहेत.

जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले,

तोचि साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा..! या संत वचनाप्रमाणे दत्ताभाऊ आणि संध्या ताईंनी असाधारण कार्य केले आहे. एवढ्यावरच न थांबता त्यांनी एचआयव्ही रोगाबाबत जनजागृती केली. मृत्यूनंतर प्रेताला जाळणे, वृक्षतोड, पर्यावरणाचा ऱ्हास अन् तिर्थांचे दूषितिकरण.... , होय... ,जल प्रदूषण, परिणामी जलजीवन धोक्यात येते हे समाजाला पटवून,

तीर्थी धोंडा पाणी,
देव रोकडा सज्जनी..!

याप्रमाणे पर्यावरण रक्षणासाठी ती रक्षा तीर्थात न टाकता

रक्षेतून वृक्ष हे अभियान राबवत ती रक्षा झाडाच्या मुळाशी टाकून आतापर्यंत हजारो झाडे लावली व ती जोपासली आहेत. यापुढे जाऊन

बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले..! या संत उक्तीप्रमाणे सर्वात धाडसी ▶▶ पान २ वर...

# सोयाबीन खरेदी केंद्रावर तात्काळ बारदाना उपलब्ध करा -प्रा. आंधळे

बीड । प्रतिनिधी

दिनांक २९ १२ २०२५ बीड जिल्ह्यात पणन महासंघा मार्फत सुरू करण्यात आलेल्या सोयाबीन खरेदी केंद्रावर बारदाना कमी पडत आहे त्यामुळे सोयाबीन खरेदी बंद झालेली आहे या खरेदी केंद्रावर तातडीने बारदाना उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकार द्वारे केली आहे.



बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सोयाबीन पिकाची लागवड करण्यात आलेली आहे खरेदी केंद्रावर सोयाबीनची अचानक आवक मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे परंतु जिल्ह्यातील पणन महासंघाच्या ४८ खरेदी केंद्रावर मागील ▶▶ पान २ वर...